**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ७९/२०१४ मधील नि. क्र. १५८ वरील आदेश**

प्रस्तुत प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज काही महत्वाची कागदपत्र दाखल करण्याबाबत केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत कागदपत्र अलीकडेच उपलब्ध झाल्याने ते त्यांना वेळीच हजर करता आले नाहीत. सदरील कागदपत्र न्यायालयात दाखल होणे न्यायपुर्ततेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहेत. तरी सदरील कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळावी.

०२. वादीने सदर अर्जास हरकत घेतली की, सदरील कागदपत्र खाजगी स्वरुपाची आहेत. सदरची कथित मोजणी करतेवेळी वादीस नोटीस दिली नव्हती अथवा सदरच्या कथित मोजणीच्यावेळी वादी हजर नव्हते. त्यामुळे सदरची कागदपत्र हजर करुन घेणेस वादीची हरकत आहे.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचेकागदपत्र अलिकडेच उपलब्ध झाले असे प्रतिवादीचे म्हणणे आहे. त्यामुळे मुद्दाम प्रतिवादीने उशिराने कागदपत्र दाखल केली असे म्हणता येणार नाही. कागदपत्र दाखल करणे हा प्रक्रियानिष्ठ विधीचा भाग आहे. त्यामुळे त्याबाबत उदारमतवादी धोरण अवलंबिले पाहिजे. सदरील कागदपत्रे ही दाव्याशी संबध्द आहेत, दाव्याचा निकाल गुणवत्तेवर होण्यासाठी ती आवश्यक आहेत. त्यामुळे ती पटलावर दाखल करुन घेणे गरजेचे आहे. कागदपत्र पटलावर नुसते दाखल झाल्यास वादीचे देखील काही नुकसान होणारे नाही. कारण त्याच्या पुराव्यातील सिध्दतेबाबत हरकत घेण्याची संधी त्यास आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात येत आहे व कागदपत्रे दाखल करुन घेण्यात येत आहेत.

स्वाक्षरीत/—

मालवण, ( स्वाती ह. पन्हाळे)

दिनांक : ०३/०५/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.